मौलिक विचार माला - २०

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

परमार्थ विचार

राजमार्ग आणि आडवाटा

रु. ५

* *डॉ. कृ. मा. घटाटे.*

(२)

श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकार्य

(इ.स. १८८१ ते १९१५)

''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात

(३)

'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* समन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या कुण्डलिनी-चक्रे-नाड्यांसंबंधी चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.

(४)

* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्वमीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.

* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्त्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांची षड्दर्शनानुसार प्रस्तुती.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा; याचे मार्गदर्शन.
* ''आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे'' या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन : उत्तरध्रुवीय मताचा परामर्श.
* ''तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती'' या ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना, भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत-साहित्याला किंवा आर्ष-वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्वतःच्या उदाहरणावरून

प्रतिपादन.

* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश. * स्त्रीगीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन. * नाटक लेखन. * १७ आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीची प्रक्रिया : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी व व्रजभाषेत एकूण लहानमोठ्या १३९ ग्रंथांची रचना.
* पत्रे-११८ *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०,
* श्लोक – १०००,
* ओव्या - २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्पायुष्यात अनेक ज्ञानशाखांना कवेत घेणाऱ्या योगदानाचा विचार केला असता- अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्यशंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्त्रोत अखंड असल्याची जाणीव होते. ०००

परमार्थ

राजमार्ग आणि आडवाटा

भारतीय तत्त्वज्ञान आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान यांच्यात मूलतः फरक आहे. भारतीय तत्त्वज्ञानात विचारानंतरच्या अनुभूतीला महत्व आहे तर पाश्चात्य तत्त्वज्ञ बौद्धिक विचारांच्यां पलीकडे जात नाहीत.

यो बुद्धेः परतस्तु सः ॥ असे गीता सांगते.

पाश्चात्य तत्त्वज्ञानाची सुरुवात बाह्य अशा जड वस्तूच्या परीक्षणातून झाली आहे, तर भारतीय तत्त्वज्ञान 'मी कोण या चेतनवस्तूच्या जिज्ञासेतून निर्माण झाले आहे. पाश्चात्य 'ज्ञेय' पदार्थाचे निरीक्षण करतात तर वेदान्तात पदार्थाला जाणणाऱ्या 'ज्ञात्याचे' निरीक्षण करून आत्मानात्मविवेक केला जातो. म्हणून पाश्चात्य तत्त्वज्ञान फिजिक्स, केमिस्ट्री वगैरे भौतिक विज्ञानाच्या शाखेपर्यत जाऊन पोचले, तर भारतीय तत्त्वज्ञान इंद्रिये, मन, बुद्धी वगैरे आंतर् पदार्थाचे निरीक्षण करीत करीत आत्मज्ञानापर्यंत

जाऊन पोचले. परंतु भौतिक सिद्धांत उपकरणांनी पडताळून पाहता येतात तसे पारमार्थिक सिद्धांत अनुभवात्मक आणि आंतर् असल्यामुळे बाह्य उपकरणांनी किंवा केवळ इंद्रियांनी इंद्रियांची शक्ति वाढवूनही त्यांची सत्यता पडताळता येत नाही.

अशा या अनुभूतिप्रधान तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात खऱ्या सत्पुरुषांनी आत्मसाक्षात्कारासाठी अनेक अनुभूतिमार्ग प्रस्थापित केले आहेत. त्यात योगमार्ग, ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग प्रमुख असून प्रत्येकात आत्मतत्त्व जाणून घेण्यासाठी निरनिराळ्या आंतर् प्रक्रिया शास्त्रकारांनी सांगितल्या आहेत. त्यापैकी कोणत्यातरी एका प्रक्रियेचा आधार घेऊन आत्मानुभव घ्यावयाचा असतो. परंतु साधकाच्या योग्यतेप्रमाणे त्याने कोणती प्रक्रिया स्वीकारावी, याचे मार्गदर्शन अनुभवप्राप्त व्यक्तिशिवाय म्हणजे गुरुशिवाय कोणी करू शकत नाही. म्हणून अनुभवी सत्पुरुषांतून सद्गुरूची निवड करण्यावाचून साधकाला अन्य मार्ग नाही.

पण यातील मुख्य अडचण अशी आहे की एखादी प्रसिद्ध व्यक्ती खरोखरीच अनुभवी आहे की नाही, हे दुसऱ्या व्यक्तीला समजणे फार कठीण आहे. या साधुपरीक्षेत बाह्य निकष फारसे उपयोगी नसल्यामुळे फसवाफसवीचे प्रकार अमाप वाढलेले आहेत. शेवटची पारमार्थिक अनुभूती सर्वांची एकच असली तरी मार्गातील अनुभूतीं व्यक्तिसापेक्ष असतात. प्रयोगशाळेत अनुभूतींचे परीक्षण करतो म्हटले तरी व्यक्तीच्या शरीरावर होणाऱ्या परिणामांचीच परीक्षा होणार, त्याच्या अनुभवाची परीक्षा बाह्य उपकरणांनी होणेशक्य नाही. हीच खरी अडचण आहे. आणि याचा फायदा घेऊन स्वार्थी लोकांनी परमार्थात धुमाकूळ घातला आहे.

परंतु ज्याला आत्मप्राप्तीची इच्छा आहे त्याने प्राचीन वेदान्तग्रंथांचा व संतग्रंथांचा अभ्यास करून त्यानुसार खऱ्याखोट्याचा निवाडा करायला हवा. नंतर सद्‌गुरूवर निष्ठा ठेऊन त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे परमार्थमार्गाचा पथिक होणे श्रेयस्कर

आहे. परंतु प्राचीन ग्रंथांचा अभ्यास संस्कृत समजत नसल्याने होऊं शकत नाही आणि प्राकृतात लिहिलेल्या सोप्या संतवाङमयाकडे साधक म्हणविणाऱ्यांना लक्ष द्यावेसे वाटत नाही आणि कष्ट न करता परमार्थ मिळावा असे वाटत असते. या मनोवृत्तीचा फायदा घेण्यासाठी कोणीही उठतो आणि स्वतःला अवतार म्हणून सांगतो. चमत्काराच्या चलनी नाण्याचा उपयोग करून दुसऱ्यांना ''परमार्थ'' सांगून स्वतःचा ''संसार'' थाटतो आणि सामान्य लोक मनःशांती मिळविण्याच्या मिषाने सांसारिक विषय मिळविण्यासाठी चमत्कारांकडे धाव घेतात आणि फसतात. अशा चमत्कारिक परिस्थितीत महाराजांनी केलेले विवेचन खऱ्याखोट्याचा निवाडा करण्यास पुरेपूर मार्गदर्शन करते.

शास्त्रप्रत्यय, गुरुप्रत्यय व आत्मप्रत्यय

वेदान्तात शास्त्रप्रचिती, गुरुप्रचिती व आत्मप्रचिती या तिन्ही परस्पर जुळल्या पाहिजेत असे आग्रहपूर्वक सांगितले जाते. म्हणूनच गुरूच्या निवडीप्रमाणे अध्यात्मशास्त्रांच्या वैराग्यपूर्वक

अभ्यासाचीहि अत्यंत आवश्यकता आहे. परंतु दुर्दैवाने शास्त्रांचा अभ्यास न करता, वैराग्याच्या भानगडीत न पडता परमार्थ साधला जावा असेच बहुतेकांना वाटते आणि ते कोणालाहि गुरु म्हणून स्वीकारतात आणि शेवटी फसगत झाल्याने कष्टी होतात. खरोखर पाहिले असतां-

मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद् यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन् मां वेत्ति तत्त्वतः॥गीता

हजारो लोकांत एखादा परमार्थाकडे जाण्याचा प्रयत्न करतो, त्या हजारोंतून एखादा कटिबद्ध होतो आणि त्यातून एखादाच भगवंताला प्राप्त करून घेतो.' याप्रमाणे स्वानुभूतीचे इतके अत्यल्प प्रमाण असल्याने उरलेल्या हजारोंमध्ये फसगत झालेलेच अधिक राहणार यात मुळीच आश्चर्य नाही. परंतु एकदम फसगत होऊन आडमार्गाने जाण्यापेक्षा मुंगीच्या वेगाने कां होईना पण शेवटपर्यंत पोहोचवणारा मार्ग चांगला! या दृष्टीने श्रीगुलाबराव महाराजांनी केलेले परमार्थातील भोंदूगिरीचे विश्लेषण साधकांना

उपयुक्त वाटेल. याचा सर्वसामान्य लोकांना कितपत उपयोग होईल, हे सांगणे अवघड असले तरी महाराजांचे ग्रंथ अभ्यासणारा वाचक मात्र महाराजांचे उपकार अगदी शेवटपर्यंत म्हणजे विदेहमुक्त होईपर्यंत विसरू शकणार नाही, हे मात्र नक्की !

परमार्थ मार्गावरील पथिक

परमार्थाकडे वळणाऱ्या लोकांमध्ये साधारणपणे तीन प्रकार दिसतात. आर्त, अर्थार्थी व मुमुक्षू. साधारणपणे जे लोक सांसारिक इच्छा पूर्ण होण्यासाठी अनेक देवदेवतांची उपासना करतात, नवस-सायास करीत हिंडतात, अशा सर्वांना परमार्थी म्हणण्याचा प्रघात आहे. परंतु त्या सर्वात बहुतेक आर्त आणि अर्थार्थीच असतात. खरे मुमुक्षू त्यात सहसा सांपडत नाहीत. खरोखर पाहिले असता वैराग्यसंपन्न मुमुक्षू हाच परमार्थाचा एकमेव पथिक आहे. तरी देखील आधुनिक समजुतीप्रमाणे साधक समजल्या जाणाऱ्या या तिन्ही प्रकारच्या लोकांचा आपण येथे विचार करू.

१. आर्त - संसारातील अनेकप्रकारच्या आपत्तींनी खचून जाऊन दुःख निवारण्यासाठी अनेक लोक देवदेवतांकडे व साधुपुरुषाकडे धाव घेतात. त्यांना शारीरिक व्याधींपासून किंवा मानसिक दुःखापासून त्वरित सुटका हवी असते. आपत्तीमुळे त्यांचे ठिकाणी आर्तता आली असते. त्यांना केवळ दुःखनिवृत्तीची इच्छा असते. खरा परमार्थ नको असतो म्हणून ते आर्तभक्त होत.

२. अर्थार्थी - स्वतः जिवापाड प्रयत्न करून देखील धनकामना, पुत्रकामना किंवा नानाप्रकारच्या सांसारिक कामना पूर्ण न झाल्यामुळे काही लोक निराश होतात. अखेरचा प्रयत्न म्हणून देवदेवतांना नवस करतात किंवा साधुसंताची सेवा करू लागतात. यांना वैराग्य मुळीच नसते सांसारिक भोग हवे असतात म्हणून खऱ्या परमार्थाचीही गरजही नसते. हे अर्थार्थी होत.

येर बहुत जोडती किरीटी । जयांची भजने भोगासाठी,
जे आशातिमिरे दिठी । विषयांध झाले ॥[ज्ञाने.७-१३८]

महाराज म्हणतात -

नाना चमत्कार नोहे हा प्रसाद । जेणे होय बोध संसाराचा ॥ ईश्वरी शक्तीचा भोगात शेवट । प्रसाद अचाट ऐसा कैसा ?[अभंग१०८६]

काही तरी ईश्वरी चमत्कार व्हावा आणि आपल्या मनोकामना पूर्ण व्हाव्या अशा अपेक्षांनी सांसारिक इच्छाच दृढ होतात ना! म्हणजे एवढी मोठी ईश्वराची अचाट शक्ती पण तिचा शेवट कुठे तर आपल्या क्षुद्र भोगात? अन् याला अचाट प्रसाद म्हणायचे? महाराजांच्या दृष्टीने हा ईश्वरी शक्तीचा उपहास करणेच आहे.

सर्व संसारसुखाविषयी कंटाळा आल्याशिवाय वैराग्यरूपी भाग्य उदय पावत नाही आणि मुमुक्षा देखील लाभत नाही त्यामुळे हे खरे परमार्थी नव्हेत.

३. मुमुक्षू - मोक्षाची इच्छा करतो तो मुमुक्षू. ज्याला संसाराचा खरोखरीच वीट आला आहे, तो साधूपासून किंवा परमेश्वरापासून संसारसुखाची मुळीच अपेक्षा करीत नाही. स्वतःवरील दुःखांची

परंपरा परमार्थासाठी तो हिताचीच मानतो त्याला तळमळ असते ती केवळ ब्रह्मरूप होण्याची ! उदा.-

१. भगवान् नारदांची आई वारली पण तेव्हा त्यांनी मायेचा पाश मोकळा झाल्याचे समाधान मानले. मातृदुःखाला भगवंताचा अनुग्रहच मानला. आणि ते परमेश्वर प्राप्तीसाठी **''उत्तरां दिशा आजगाम''!** उत्तर दिशेला निघते झाले.

२. संत श्रीतुकारामांची पत्नी व मुले दुष्काळात मृत्यु पावली. त्यासंबंधी त्यांनीही देवाला धन्यवादच दिले. तसेच त्यांनी कर्कशा बायको, वाईट संसार, अन्नान्नदशा, लोकांपासून होणारे अपमान वगैरे दुःखदायक गोष्टी परमार्थाला साधक समजून आनंदाने स्वीकारल्या. खरी मुमुक्षुता ही अशी असते.

३. कुंती देखील **''आपदः सन्तु मे शश्वत्''** मला सतत दुःखपरंपरा दे म्हणजे तुझा कधी विसर पडणार नाही. असे श्रीकृष्णाला मागणे मागते[१] यातीलही मर्म हेच आहे.

समर्थ रामदास दासबोधात म्हणतात,

संसारदुःखे दुखावला । त्रिविध तापे तापला ।
तोचि अधिकारी जाहला । परमार्थासी ॥दासबोध.

संसारदुःखांनी संतप्त झालेला पुरुषच परमार्थाला अधिकारी होत असतो. मनाच्या श्लोकात उपदेश करतात, **देहदुःख ते सूख मानीत जावे॥**[१०]

अशी खऱ्या पारमार्थिकांची स्थिती असली तरी इतरहि स्वतःला पारमार्थिक म्हणवून घेण्यात भूषण मानतात. पण साधनचतुष्टयसंपन्नता नसली तरी काही लोकांना मोक्षाची इच्छा असते. पण त्यासाठी त्यांना संसार सोडवत नाही. संसारात राहूनच हळूहळू विषयभोगाचे ते नियमन करतात आणि परमार्थाचा थोडाफार प्रयत्न चालू ठेवतात. यांच्यासाठी सर्व संतांनी सदाचाराचा, उपासनांचा आणि नामस्मरणाचा मार्ग सांगून ठेवला आहे.

श्रीगुलाबरावमहाराज म्हणतात, जोपर्यंत तीव्र मुमुक्षा होत नाही तोपर्यंत संसार सोडून देणे ही परमार्थाची विटंबनाच होय. आत परमार्थाची इच्छा वाढवीत जावी पण बाहेरील व्यवहार मात्र करीत

असावे. भगवंताचे प्रेमाने भजन करून वैराग्याचा प्रयत्न करावा. तीव्र मुमुक्षारूपी भाग्य उदय पावेपर्यंत शास्त्रानुसार सदाचरण करून प्रपंच करीत असतानाच परमार्थविवेक साधावा. मध्यमाला हाच मार्ग उत्तम आहे ![२] पण यासाठी देखील सद्गुरूंच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

शास्त्रज्ञोऽपि स्वातंत्र्येण ब्रह्मान्वेषणं न कुर्यात् ।
स गुरुमेव अभिगच्छेत् ॥ - बृहदारण्यकोपनिषद्

सद्गुरुवांचोनि सांपडेना सोय ।
वंदावे ते पाय आधी त्यांचे ॥ श्रीतुका.

याप्रमाणे वैदिक श्रुतींपासून तो संतांपर्यंत सर्व महात्म्यांनी आणि शास्त्रांनी सद्गुरूची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. त्यामुळे साधकाला सत्संगती आणि गुरूचा शोध करणे क्रमप्राप्त आहे. अशा शोधात फिरत असलेला साधक मानसिक दृष्टीने अत्यंत दोलायमान स्थितीत असतो.

''कसे करूं काय करूं'' या अष्टाक्षरी मंत्राचे प्रतिध्वनी त्याच्या हृदयात उमटत असतात. या आकुल

मनोवस्थेत जर त्याचे वैराग्य तीव्र नसेल, मुमुक्षा कमी पडत असेल तर मात्र तो अनेक अडचणीत सापडतो. मुख्य धोका म्हणजे चमत्कारांचा! तो चमत्कारांच्या आभासांना भुलला की त्याचे पुनःपुनः पतन होते म्हणून चमत्कार पाहण्याची अभिलाषा त्याने मनातल्या मनातच जिरवून प्रयत्नपूर्वक नाहीशी केली पाहिजे.

व्युत्थाने सिद्धयः। समाधौ उपसर्गाः ॥ योगसूत्र ३७ पाद ३

चमत्कारा न कर्तव्याः स्थाने कार्यं विना क्वचित् ।
भगवत्कष्टदा व्यर्थाः इति स्वमतनिर्णयः ॥ य १६

चमत्कार

सिद्धी या समाधीमध्ये विघ्ने असून व्युत्थान-दशेतच होत असतात. म्हणून चमत्कारांकडे साधकाने मुळीच लक्ष देऊ नये आणि सिद्धांनी संसारदायक चमत्कार करू नयेत, ते व्यर्थ होत, अशी धारणा साधकाने आपल्या मनात पक्की ठसविली पाहिजे.

साधारणपणे साधूंच्या चरित्राशी चमत्कारांची सांगड घातलेलीआढळून येते. पण चमत्कार करणे हे काही साधुत्वाचे व्यवच्छेदक लक्षण नव्हे. साधूंचे

ठिकाणी चमत्कार करण्याचे पूर्ण सामर्थ्य असते पण चमत्कार करणारा प्रत्येकजण साधू राहीलच असे मात्र मुळीच नाही. खरे साधू आपली आत्मस्थिती किंवा सामर्थ्य बाहेर दिसू देत नाहीत. उलट, **वेडिवेमाजी दडे । महिमे भेणे ॥ज्ञाने.** अशी त्याची मानसन्मानासंबंधी वृत्ती असते. म्हणून चमत्कारांकडे दुर्लक्ष करावे.

आता चमत्कार हे समाधीला उपसर्ग म्हणून आहेत तर त्यांचा काय उपयोग? असे वाटत. परंतु चमत्कार समाधीला विघ्नरूप असले तरी त्यांचे दोन महत्वाचे उपयोग आहेत.

सिद्धींचा उपयोग

१. ध्यानयोगातील समाधीपर्यंतच्या मार्गावरील टप्पे बरोबर आहेत की नाहीत, हे बघण्यासाठी दीपस्तंभ म्हणून सिद्धींचा महत्वाचा उपयोग असतो. या सिद्धी परमार्थमार्गावरील खुणा आहेत. शास्त्रानुसार आत्मप्रचिती येत आहे की नाही, हे या सिद्धींच्या प्राप्तीमुळे कळते. त्यामुळे पुढील

वाटचाल करण्यात साधकाला हुरूप वाटतो.

२. पूर्ण ब्रह्मानुभव प्राप्त करून घेतलेला महात्मा या सिद्धींकडे मुळीच लक्ष देत नाही. पण त्याचे जवळ एखादा अधिकारसंपन्न साधक आला असेल आणि जर काही अडचणींमुळे तो परमार्थ मार्गात मध्येच अडला असेल तर मात्र स्वतःचे सामर्थ्य दाखवून सत्पुरुष त्याचे चंचल मन आश्वस्त करतात आणि धीर देतात. या धैर्याच्या बळाने व सद्गुरुनिष्ठेने तो सर्व अडचणींवर स्वतःच्या प्रयत्नांनी मात करतो आणि परमार्थ हस्तगत करतो. असे चमत्कारांचे दोन उपयोग आहे.

महात्म्यांचे व्यक्त होणारे सर्व चमत्कार खरोखर सांसारिकच असतात. पण सांसारिक चमत्कार करूनहि संत साधकाला प्रपंचातून बाहेर काढतात. **खरोखर पाहतां संसारातील भोग मिळविण्यासाठी ते चमत्कार नसून संसार सोडविण्यासाठी असतात.** केवळ कामनिक लोकांच्या कामना पूर्ण करीत बसणे हे काही संतांचे कार्य नव्हे.

उलट, संत स्वतः संसारातून पूर्ण विरक्त असल्यामुळे इतरांनीहि संसाराला तिलांजली द्यावी अशीच त्यांची मनापासून अपेक्षा असते. परंतु सामान्य लोक हे विचारात घेत नाहीत आणि आपल्या प्रापंचिक वासना पूर्ण कराव्या म्हणून ते साधूंच्या मागे लागतात. पण खरे संत चमत्कारांच्या आमिषाने लोकांना भुलवीत नाहीत. म्हणूनच चमत्कार करू शकणाऱ्या 'इतरे जनांना' फावते आणि शेवटी कामनिक लोकांची फसगत होते.

चमत्कारांची कारणे

महाराज म्हणतात - चमत्कार असल्यामुळे हा साधू आहे, असा विश्वास ठेवणे योग्य नाही. कारण चमत्कार हे एकाग्र चित्ताचे सामर्थ्य आहे. चित्त विचारावर एकाग्र होवो की विकारावर एकाग्र होवो, ते एकाग्र झाले की आपोआप चित्ताचे सामर्थ्य अलौकिक रीतीने व्यक्त होऊ लागते आणि निरनिराळे चमत्कार घडतात. म्हणून चमत्कार करणारा वैराग्यसंपन्न व ब्रह्मानुभवी असाच पुरुष असला

पाहिजे असे मुळीच नाही. चमत्कार घडल्यामुळे त्या व्यक्तीत सामर्थ्य आहे हे कळते पण ते परमेश्वरप्राप्तीचे गमक मात्र नाही हे लक्षात ठेवायला हवे.

उदा. **हिप्नॉटिझम्, मेस्मेरिझम्** हे सर्व मन एकाग्र करण्याचे प्रयोग आहेत. त्यांच्या द्वारा मनुष्याला भोगच सुलभ झाले आहेत. यांत वैराग्याची मुळीच गरज नसते. महात्म्यांचे सामर्थ्य आणि अशा विकारांवर मन एकाग्र करणाऱ्या लोकांचे सामर्थ्य यांत हाच मूलभूत फरक आहे.

कधी कधी लहान मुलाने सांगितलेल्या गोष्टी देखील खऱ्या होतात. याचे कारण लहान मुलांचे मनात संशय नसतात, मन चंचल नसते म्हणून त्यांच्या मनाने सांगितलेल्या गोष्टी तंतोतंत सत्य होतात. पुढे जसे जसे त्यांचे चित्त संशयादिक विकारांनी मलीन होत जाते तसे तसे चमत्कार होणेहि बंद पडते. याप्रमाणे वैकारिक एकाग्र मनाप्रमाणेच लहान मुलांचेहि चमत्कार घडतात म्हणून त्यावरून परमार्थप्राप्तीचे अनुमान करणेपूर्णपणे चुकीचे आहे.

असे असूनही साधकांना व सामान्य लोकांनाही चमत्कारांचे विलक्षण कुतूहल असते. संतांनी काहीतरी मोठा चमत्कार करून आपली सांसारिक विवंचना दूर करावी. आपले कोटकल्याण करावे किंवा डोक्यावर हात ठेवून ब्रह्मज्ञान करून द्यावे अशी सामान्यांची सुप्त इच्छा असते. म्हणूनच ते चमत्कारांकडे ओढले जातात.

श्रीगुलाबरावमहाराजांनी साधुबोध या ग्रंथातील प्रश्नोत्तरात या संबंधी सुट्या सुभाषिताच्या पद्धतीने मार्मिक उत्तरे दिली आहेत.[३] त्यातील काही बिंदू पाहू -

१. मूर्ख व नीच पुरुष 'चमत्काराला च' मान देतात.

२. मध्यम पुरुष 'सदाचाराला' मान देत असतात, कारण नुसते चमत्कार गारुडी लोक देखील करतात असे त्यांचे म्हणणे असते. म्हणून सदाचाराशिवाय चमत्कार असतील तर ते तिकडे लक्ष देत नाहीत.

३. उत्तम पुरुष ब्रह्मज्ञानालाच महत्व देत असतात. कारण चमत्कार हे प्रारब्धमूलक आहेत हे त्यांना ठाऊक असते. चमत्कार इहलोकी व तितक्या वेळेपुरताच उपयोगी पडतो व **सदाचार हा लोकांना अनुकरण करण्यासाठी नेहमीकरता उपयोगी पडतो** म्हणून चमत्कार व्यर्थ आहेत. धर्मानुसार असलेला सदाचार हा स्वतःला दुर्गतीपासून सोडविण्यास व ब्रह्मज्ञानानंतर लोकांना मार्गदर्शन करण्यास उपयोगी आहे म्हणून **''सदाचार आणि ब्रह्मज्ञान हेच निकष साधुपरीक्षेस लावले पाहिजेत.''**

''ज्यांच्यां मनात चमत्कारांची अभिलाषा असते त्यांच्यापुढे खऱ्या मोठेपणाची किंमत नसते.[४] हे रामासारख्यांवर विश्वास ठेवणार नाहीत पण बायकोच्या अंगात येणाऱ्या पिशाच्चावर विश्वास ठेवतात. यांच्या देवघरामध्ये शालिग्रामाबरोबर झोटिंगाच्या व पीराच्या मूर्ती असतात. हे लोक कितीही धार्मिक असले तरी यांच्यावर विश्वास ठेंव नये. कामनेनुसार यांचे धर्म प्रतिदिनी बदलत असतात.

(२५)

तहानेलाला पाणी देण्याचा देखील हे मोबदला इच्छित असतात. यांचा घरी जेवल्याने शहाण्या लोकांची अपकीर्ती होत असते. म्हणून यांची घरे टाळावीत.'' असे सांगून शेवटी महाराज म्हणतात-

''चमत्कारांची आशाच असेल तर ते आपल्या इष्ट देवतेपासून मिळावेत, नाहीतर नकोत. इतके धैर्य तरी साधारण शहाण्या धार्मिकाने धरले पाहिजे.''[५] असा अनेक ठिकाणी महाराजांनी चमत्कारांचा निषेध केला आहे. चमत्कारांचे महत्व, साधना करीत असलेल्या साधकाला काही मर्यादेपर्यंतच आहे. साधुपरीक्षेसाठी चमत्कारांचा यत्किंचितहि उपयोग नाही असे त्यांनी दाखवून दिले आहे. ते म्हणतात-

जनांसाठी संतमनी कळवळा । कृतघ्नता चाळा जनमनी ॥२॥ साधु भेटलिया इच्छिती संसार । सिद्धि चमत्कार पाहुनिया ॥३॥ पुरे आता नको ऐसियाचा संग । कपिचेष्टी अंग सदा ज्यांचे ॥४॥

अभंग१०७२

(२६)

वेडे आणि साधू

आजकाल लोकविलक्षण वागले की साधू म्हणून समजण्याचा प्रघात पडला आहे. खरे साधक जे असतात त्यांच्या आयुष्यात एक काळ असा येतो की ते जगातील व्यवहार बरोबर सांभाळूं शकत नाहीत. त्यांनी व्यवहाराकडे लक्ष दिले की ध्यानाकडे लक्ष लागत नाही व ध्यानाकडे मन लागले की व्यवहारात ते वेडे ठरतात. पण काही कालानंतराने त्यांची ही उन्मत्तवत् अवस्था संपते व पुनः प्रारब्धामुळे म्हणा की लोकसंग्रहासाठी म्हणा, सामान्य लोकांप्रमाणे ते व्यवहार करूं लागतात. या मधल्या उन्मादावस्थेमुळे सामान्य लोकात वेड्यांना साधू समजण्याचा प्रघात पडला आहे. पण अशा लोकांमुळे साधकांना फारसा फायदा कधीच होत नाही. उलट वेडे आणि साधू यांच्यातील फरक न कळल्यामुळे साधकांचे नुकसानच जास्त होते. म्हणून वेडे व साधू यातील फरक काय ते महाराजांनी अलौ.व्याख्यानमालेत शास्त्रांच्या आधाराने आणि सडेतोड युक्तिवादाने पटवून दिले

(२७)

आहे. **उन्मत्त, स्वकृतोन्मत्त व मिथ्योन्मादग्राही** असे उन्मादाचे तीन प्रकार सांगून त्यातील खरा साधू कोण व कसा ओळखावा, यासंबंधी बऱ्याच मौलिक सूचना दिल्या आहेत.

१. उन्मत्त - कोणत्यातरी रोगामुळे किंवा मानसिक विकारामुळे काहीजण वेडे झालेले असतात. या खऱ्या वेड्यांना साधू समजणे, शुद्ध मूर्खपणाचे आहे.

२. स्वकृतोन्मत्त - जसा विकार येईल तशा प्रकारे मन एकाग्र करण्याच्या पद्धतीत असलेले लोक आपणा स्वतःलाच वेड लावून घेत असतात. अशा लोकांच्या हातून केव्हा केव्हा चमत्कारहि होतात, केव्हा केव्हा यांच्या मुखातून आत्मोपदेशहि निघतो व केव्हा केव्हा बालिशपणाची कृत्येही होतात. अशा लोकांत व वेड्यांत फारसा फरक नसतो, असे महाराजांचे मत आहे. फरक असेल तर तो इतकाच की वेड्यांची इच्छा नसून त्यांना वेड लागलेले असते व यांनी आपल्या इच्छेनेवेड लावून घेतलेले असते.

(२८)

जगात बहुतेक अशा लोकांनाच साधू समजण्याचा परिपाठ आहे.

३. मिथ्योन्मादग्राही - ज्ञान झाल्यावर ज्ञानस्थिति सांभाळण्यासाठी व मानापमानांचे ठिकाणी समता ठेवण्यासाठी काही पुरुष वेड्यासारखे वागतात. **शिष्टः शिष्टवत् न आचरेत् । जडवत् चरेत् ॥** - शिष्टांनी शिष्टाप्रमाणे वागूं नये जडमूढांप्रमाणे वागावे अशा प्रकारचा श्रुतीतही उपदेश आहे. असे वागत असताना जर अपमान झाला तर त्याला **'अमृतपानयोग'** म्हणून सत्पुरुष आनंदाने स्वीकारतात. मुद्दाम करून घेतलेल्या अपमानाचा शास्त्रांनी गौरव केला आहे. अशा लोकांविषयी -

वाचस्पतीचेनि पाडे । सर्वज्ञता जरी जोडे ।

œ ÿ Äg ª ç ÿ t gz@ª uÒª z§ÿnz@@ज्ञाने.

असे माउलीनेही म्हटले आहे. भागवतात वर्णिलेले ऋषभदेव, जडभरतादि व शेगांवचे गजाननमहाराज वगैरे या तिसऱ्या प्रकारापैकीच होत असे महाराजांचे मत आहे. या लोकांची

तारंगस्थिति म्हणणे केवळ औपचारिक आहे. पण त्यांनी आपणहून कृपा केल्याशिवाय ते साधू आहेत की वेडे आहेत हे मुळीच ओळखता येत नाही. म्हणून,

''नमन-पूजन श्रद्धा असेल त्याचे करावे पण या तारंगस्थितीच्या भरवंशावर जाऊन गुरुत्वाचे नाते लावून घेऊ नये.''

- असे कडक पथ्य जर पाळले गेले नाही तर त्यापासून नुकसानहि फार मोठे होते. यासंबंधी ऋषभदेव आणि आर्हतराजा यांचा भागवतातील इतिहास महाराजांच्या अलौकिक व्याख्यानमालेतून[७] अवश्य वाचण्याजोगा आहे.

मिथ्योन्मादग्राही साधूंचा परमार्थ-प्राप्तीच्या दृष्टीने फारसा उपयोग नसला तरी ते जेव्हा उपदेश करतात तेव्हा मात्र तो उपदेश अत्यंत ग्रहण करण्याजोगा असतो. ऋषभदेवांनी भरतादि शंभर सगरपुत्रांना सत्रात केलेला उपदेश आणि जडभरतांनी रहूगण राजाला केलेला उपदेश आत्मप्राप्ती करून देणाराच होता. उपदेश ऐकणाऱ्यांचे परम कल्याणच

झाले. परंतु एखाद्याला दैवयोगाने सुवर्णाचा हंडा सांपडला म्हणून सर्वांनीच आपला कामधंदा सोडून हंड्याची वाट पाहत आयुष्य गमावणे योग्य नाही. त्याचप्रमाणे **मिथ्योन्मादग्राही** साधूंचा सर्वसाधारण साधकांना मुळीच उपयोग नसतो.

एकूण काय तर या **तारंगस्थिती**तील सत्पुरुष ओळखता येणे कठिण आहे. म्हणून ज्ञानी असून, सदाचारसंपन्न राहून जो राजरोस लोकसंग्रह करतो, अशापासूनच विकार नाहीसे करण्याची व मन एकाग्र करण्याची प्रक्रिया शिकली पाहिजे. नाहीतर संसारसुखही मिळत नाही व परमार्थही हातचा दवडतो आणि शेवटी दुःख मात्र भरपूर मिळते.[८] म्हणून-

१. संस्कार ज्याला चांगल्या रीतीने करून देता येत नाही व जो विकारांच्या स्वाधीन आपली एकाग्रता ठेवतो, अशापासून, किंवा -

२. ज्ञानी व उत्तम प्रक्रियाप्रवीण असूनही आपल्यावर जो संस्कार करीत नाही, अशापासून

एकांगी विकृत पद्धतीने एकाग्रता शिकू नये.

सत्पुरुष वेड्यांसारखे वागले तर त्यांना पाप होत नाही हे खरे, पण दुसरे लोक जर त्याप्रमाणे वागले तर त्यांना अधर्म घडून ते नरकात पडतात, त्यांची अधोगती होते यात संशय नाही.

अडाणी लोकांत लहरी पुरुषांना साधू समजण्याची पद्धत आहे[९] व त्यापासून पूर्वी झालेले आणि आताही होत असलेले नुकसान दिसत आहे. म्हणून गुरुत्वाचे नाते लावून घेताना फारच खबरदारी घ्यावयास हवी. अशांवर श्रद्धा बसली तर नमस्कार-पूजनादि अवश्य करावे पण गुरुत्वाचे नाते मात्र लावून घेऊ नये. नाहीतर परमार्थ तर मिळत नाहीच पण संसाराचीही थट्टा होते.

बरे, या साधुपरीक्षेमध्ये चमत्कारांची जशी अडचण आहे त्याचप्रमाणे दुसरीहि एक अडचण आहे.कोणीही लुंगासुंगा उठतो व परमेश्वराचा अवतार म्हणून पुढे येतो. परमार्थाच्या नांवाखाली राजयोगी म्हणून सर्व प्रकारचे विषय उपभोगतो. प्रारब्धाच्या

नांवाखाली याच्या सर्व लीला चालतात. पण त्यात बिचारा सामान्य परमार्थेच्छू मात्र फसविला जातो. यासंबंधी महाराजांनी केलेले भोंदूगिरीचे विश्लेषण आणि निर्णय मार्मिक आहेत.

भोंदूचे शब्दचित्र

साधूची परीक्षा करून खरा साधू कोण आहे हे ओळखणे फारच कठीण आहे. खरा साधू आपली आत्मस्थिती प्रगट करीत नाही आणि केवळ बाह्य आचरणावरून खऱ्या साधुत्वाचा निश्चय होऊ शकत नाही. आत्मज्ञानसंपन्नता दृश्य नाही आणि बाह्य व्यवहार प्रारब्धाप्रमाणे कोणताही असूं शकतो, म्हणून साधकाला साधूचा शोध घेतांना वाटेत अनंत अडचणी उभ्या ठाकतात. आणि फसगत झाली की संसार ना परमार्थ अशी त्रिशंकूची अवस्था होते. सप्तमयष्टीतील मुळे मास्तरांना पाठविलेली दोन पत्रे,[१०] द्वादश यष्टीतील योग आणि विपर्यास,[११] वेदान्त व योग[१२] इ. काही पत्रे यातून आणि साधुबोधातील प्रश्नोत्तरातून महाराजांची वर्णन केलेले भोंदूसाधूंचे चित्रण मूळातून

(३३)

पाहू.

*स्वतः शरीराकडून कष्ट न करणे ही जीवन्मुक्ती असल्यामुळे उपजीवेकेसाठी आम्हाला लबाड्या कराव्या लागतात.

*एखादा गुरु म्हणविणारा आपल्याहून जास्त झाला की आपल्या शिष्यमंडळीत त्याचेविषयी निंदा सुरू केलीच म्हणून समजा.

*संस्कृतविद्वान पुढे आला तर लोककल्याणाचे ढोंग करून प्राकृताने त्याला अडवावे लागते.

*श्रीतुकारामांच्या अभंगाने कीर्तन करणारा पुढे आला तर संस्कृतातील दोन विभक्त्या घेऊन अडवावे लागते.

*काही येत नसले तर शांतीच्या आड लपता येते.

*एखादा ज्ञानी भेटला तर उपासनेची प्रशंसा व उपासकापुढे ज्ञानाची प्रशंसा करावी लागते.

*मूर्तिपूजेला दगडाची पूजा म्हणवून स्वदेहाची पूजा करविण्यात हातखंडा असावा लागतो.

(३४)

*वेश्येला वर्गणी दिल्यास तिच्याकडून मोबदला मिळतो.

*कुत्र्याला खाऊ घातल्यास ते इमानाने घर राखते.

*भंग्याला वर्गणी दिल्यास तो तर रोगाचे बीज बाहेर नेऊन टाकतो.

*आम्हा लोकांना वर्गणी दिल्यावर त्याचा मोबदला आम्ही काहीच देत नसतो. वेदांताच्या मागे लपून वाटेल तसे करता येते. काम, क्रोध, मद, मत्सर सर्व काही प्रारब्धाच्या नांवाखाली दडपून आवडतात. आत्मानुसंधान सोडून विष्ठा खाल्ली तरी पाठीराखे इतके समर्थ आहेत की ईश्वराच्या हातून शिक्षा होऊ देत नाहीत.

*प्रथम आपले विकार लपवून ठेवून नंतर शिष्यांच्या मायबहिणींचे ठिकाणी प्रगट झाले म्हणजे प्रारब्धाच्या साह्याने ते उज्वल ठरविता येतात. विकार बाहेर फुटेपर्यंत शुकाचार्यासारखे ब्रह्मचारी व नंतर कृष्णासारखे सर्वसमर्थ भोगी होतात.

(३५)

*योगी भेटला तर चमत्कारात काही अर्थ नाही म्हणावे लागते.

*कर्मठ भेटल्यास हा तुच्छ वस्तूच्या मागे लागला आहे असे म्हणावे लागते.

*नांवविचारल्यास या देहाला अमुक म्हणतात असे उत्तर येते, जसा काही आमचा देह अब्रह्मठिकाणी पडला आहे.

*महाराज म्हणतात- हर हर ! या लबाडीच्या कचाट्यातून कोण कसा सुटत असेल ह्याचे मला मोठे गूढ पडले आहे.**जी गोष्ट नेहमीच थोडी असायची ती मोठ्या प्रमाणावर दिसू लागली की तीत काही लबाडी असते,** हा सृष्टिनियमच आहे.

*ही टोळधाड जेथे जाऊन पडेल त्याच्या घरादाराची व नीतीची राखरांगोळी झालीच म्हणून समजा.

*सर्वच ब्रह्म आहे.म्हणून त्यागवृत्तीपेक्षा भोगववृत्तीलाच फार जोम येतो.

*एकदा मुक्ती मिळवून घेतल्यावर आता

(३६)

संसाराचीच व्यवस्था करावयाची असते.

*धन दिल्यास वेश्या मनोरंजन तरी करते, पण उलट आम्हाला लोकांचा प्रत्येक ठिकाणी मनोभंग करावा लागतो. हा धंदा म्हातारा झाल्यावरही बंद पडत नाही.

*तीर्थातून व सत्कर्मातून वेश्यांना घालवून दिले जाते पण आमच्यावाचून तीर्थाला व सत्कार्याला शोभाच येत नाही.

*आम्हा लोकांचा कावा कोणीच उत्तमरीतीने बाहेर काढला नाही, त्यामुळे आर्यावर्ताचा आमच्या वर्गाखाली पार चुराडा झाला आहे.

*वेश्येचे नटणे गणिताने कसलेले असून आमचे नटणे अगणित आहे.

*दुसरा आमच्याशी समान वर्ग कुत्र्याचा आहे. कुत्र्याला कुठेही पडलेली विष्ठा चालते, पण ताजे करून दिलेले ज्वारीचे अन्न आम्हाला चालत नाही. लाडू अनरसे पाहिजेत.

*कुत्रा काही दिवस तरी एका मालकाच्या

(३७)

घरी राहतो. पण आम्हाला रोज नवा मालक शोधावा लागतो.

*तिसरा आमच्याशी समान वर्ग गाढवांचा आहे. परंतु धुळीत लोळणे व गादीवर निजणे इतकाच दोहोत फरक आहे.

*कावळा मृतांचे पिंड भक्षण करतो व आम्ही जिवंताचे पिंड भक्षण करतो. हाच आमच्यात कावळ्यापेक्षा विशेष होय.

*आमच्या वर्गात दोन वर्ग आहेत. मूर्ख व शहाणा. मूर्खलोकांच्या उपजीविकेचे साधन वेदांत असतो. सर्व आशा कायम ठेवून विदेहीपणा दाखविणे हे पहिल्या वर्गाचे लक्षण आहे. आम्ही परस्परास भेटलो म्हणजे दोघांच्याही तळपायाची आग मस्तकात जात असते. परंतु आम्हाला परस्पर लोटांगणे घालावी लागतात. साधारणपणे लोकांना मान देण्याऐवजी उद्धटपणा करावा लागतो व शब्दात कळकळ आणावी लागते. एखादा दर्शनास आल्यास सरळ 'या' म्हणण्याऐवजी 'ये बापा देवा, कई

(३८)

आलास, लई दिवसानं दर्शन झालं बापा तुहं, तुह्या पायाची खाक हो मी' असे म्हणावे लागते.आम्हाला खरे शास्त्र येत नसल्यामुळे रूपकाचे काही तरी बोलावे लागते. मग त्याचा अर्थ मंडळीला कसातरी करून घ्यावा लागतो.

*अनुग्रह करावासा वाटेल तर आम्ही मनुष्याला आईबापाविरुद्ध व बायकोला नवऱ्याचे विरुद्ध वागण्यास सांगतो. पण जेथे नवरा आमच्या म्हणण्याप्रमाणे वागत नाही तेथे तिला पतिसेवा सांगत असतो. जेथे बायकोचे वर्चस्व असते तेथे तर आम्हीच नवरे होत असतो. आमचा उद्धार करण्यास तो परमेश्वर लवकर अवतार धरो.

*कित्येक योगियांना पूर्वजन्मीच्या आयाबहिणी भेटण्यापेक्षा बायकाच पुष्कळ भेटतात. परंतु या जन्मी तिच्याशी विवाह केला पाहिजे की काय? दत्तात्रेय हे ब्रह्मचारी ब्राह्मण. त्यांना मुसलमानादींच्या जन्मात येऊन पूर्वजन्मीच्या बायका शोधण्याचे कोणते काम पडले ते काही समजत नाही.

(३९)

अशा प्रकारे नानाप्रकारची एकदम न दिसणारी भोंदुगिरी महाराजांनी उजेडात आणली आहे.

खरोखर पाहतां.....

खरोखर पाहिले असता परमार्थात कोणीहि कोणाला फसवूं शकत नाही. जो अगदी निष्काम आहे, ज्याने आपल्या संसारावर निखारे ठेऊन परमेश्वर-प्राप्तीचा दृढनिश्चय केला आहे त्याला फसविणारा अजून कोणी निपजलेला नाही. अत्यंत जड अशा पाषाणाच्या ठिकाणी जर दृढ परमेश्वर भावना झाली तर तेथेही परमेश्वर अविर्भूत होऊन भक्ताचे मनोरथ पूर्ण करतो तर, साक्षात चेतन असलेल्या मानवमूर्तीच्या ठिकाणी श्रद्धा असली तर काय परमेश्वर त्यांच्या हाकेला 'ओ' देणार नाही! असे कधी शक्यच नाही.

धरलिया भाव ।
होती पाषाणाचे देव ।
मग तुमचीच भेट ।
केवि दाविल ना वाट ॥ [५३८]

(४०)

भिल्ल भक्त

एक शिवोपासक राजा होता. त्याला एका जंगली भिल्लाने शिवपूजा कशी करावी म्हणून विचारले. राजाने सहज सांगितले की, ''रोज नूतन चिताभस्म वाहत जा. तुला शिव प्रसन्न होतील.''

त्याने राजाच्या वचनावर दृढ निष्ठा ठेवली. तो त्याप्रमाणे रोज पूजा करू लागला.पण एके दिवशी खूप प्रयत्न करूनहि ताजे चिताभस्म मिळाले नाही. तेव्हा त्याच्या बायकोने शिवपुजेच्या भस्मासाठी स्वतःलाच जाळून घेतले. तिच्या भस्माने भिल्लाने पूजा केली आणि नेहमीप्रमाणे आरतीच्या आधी 'नैवेद्य आण' म्हणून बायकोला हाक मारली. तेव्हा शिवकृपेने ती जिवंत झाली व नैवेद्याचे ताट घेऊन समोरआली. असा शिवमहिमा पाहून दोघांच्याही नेत्रातून घळघळ अश्रू वाहू लागले. त्याचवेळी शिवाने दर्शन दिले व दोघांनाही कृतार्थ केले.

हा प्रसंग राजाला कळला. त्याला आश्चर्य वाटले. 'आपल्याला साक्षात्कार नाही पण आपल्या

(४१)

शब्दावर विश्वास ठेवून जंगली भिल्लाचा उद्धार झाला आणि आपण मात्र तसेच कोरडे राहिलो' असे वाटून स्वतःबद्दल फार दुःख झाले. त्याचा भक्तिभाव पाहून भगवान् शंकरांनी त्यालाही कृतार्थ केले.

मीराबाई

असाच मीराबाईंचाही लहानपणाचा प्रसंग आहे. तिला लहानपणी एका साधूने कृष्णमूर्ती दिली. पुढे तिला साक्षात्कार झाला. काही वर्षांनी ते साधू पुन्हा आले तेव्हा गुरु म्हणून मीराबाईंनी त्यांची पूजा वगैरे केली. पण जेव्हा साधूला तिच्या साक्षात्कारा-विषयी समजले तेव्हा साधूने तिची प्रार्थना केली की, 'मलाही कृष्णदर्शन घडवून दे' तेव्हा मीराबाईंनी श्रीकृष्णाचा धावा केला व गुरूलाहि कृष्णसाक्षात्कार करून दिला.

या दोही प्रसंगातून एकच दिसते की जरी अज्ञानी गुरूवर दृढ विश्वास ठेवला तरी भगवान् साधकाला कृतार्थ करतात. कोणीही दृढ श्रद्धावंताला फसवू शकत नाही.

(४२)

तसेच स्त्रियांना पतीलाच परमेश्वर व गुरु मानण्यास शास्त्रांनी सांगितले आहे. पतीच्या माध्यमाने भगवान् पतिव्रतेला पूर्ण साक्षात्कार घडवून देतात. असे नसते तर अज्ञानी पतीचे भजन करून पतिव्रता पूर्ण झाल्या असत्या काय? म्हणून **'येथे प्रतिफळे भावना आपुलाली'** हे ज्ञानोबामाउलीचे वचनच अर्थपूर्ण आहे, हेच खरे!

परंतु असे असले तरी सामान्य साधकाच्या मनाची येवढी तयारी नसते. परमार्थ सहज साधला तर त्याला हवा असतो. संसार सोडण्याची त्याची इच्छा नसते म्हणून तो संसार सोडण्याचा म्हणजे वैराग्याचा आव आणतो आणि जर का साधूने काही मागितले किंवा खरोखरच काही त्याग करण्याचा प्रसंग आला तर मात्र तो गडबडतो आणि उलट साधूवरच 'लोभी,दांभिक' वगैरे आरोप करू लागतो. आपल्या गुरूलाच शिव्या मोजीत बसतो.

तैसे संसारी आसक्त । परस्पर मिसळती काकवत । मग गुरुदोष पाहती अखंडित । तयांचे वचन प्रमाण

(४३)

कैसे ॥ (संप्र.सुरतरु)

जसे आपण स्टेशनवर उशीरा गेलो की आगगाडी निघून गेलेली असते. चूक आपली असते. पण आपण म्हणतो 'गाडी चुकली'. आपण आपली चूक गाडीवर लादतो. त्याचप्रमाणे फसवा साधक सर्वस्व अर्पण करण्याची तयारी दाखवितो पण वेळ आली की पाऊल मागे घेतो. वैराग्याच्या सोंगाने साधूंना फसविण्याचा प्रयत्न करतो आणि सर्वस्व देण्याचा प्रसंग आला की 'साधूनेच फसविले ' म्हणू लागतो. म्हणून प्रथम शास्त्रशुद्ध सदाचरणाने वर्णाश्रमधर्म काटेकोरपणे पाळून चित्तशुद्धी आणि वैराग्य साधण्याचा साधकाने प्रयत्न केला पाहिजे. त्यानेच खरी मुमुक्षा उत्पन्न होते आणि त्यानंतरच वैराग्याच्या भरवंशावर परमार्थमार्ग शेवटपर्यंत निर्विघ्नपणें पार केला जाऊ शकतो. महाराज म्हणतात-

''ज्याला सर्वस्व अर्पण करता येते किंवा माझे काहीच नाही, असे जो समजतो तो कधीच फसत नाही''(१३)

(४४)

***''जो जगात माझे काही आहे असे समजतो किंवा अर्पणकरतांना ज्याला आपल्याकरता काही राखून ठेवावे लागते तो नित्य फसणारा आहे.**(१४)

याप्रमाणे सर्वस्वत्यागाचा आव आणून जे गुरूला फसविण्याचा प्रयत्न करतात अशा सांसारिक लोकांना गुरूही तसेच भेटतात. परमेश्वराने भोंदू शिष्यांसाठी भोंदू गुरूची पैदास भरपूर करून ठेवली आहे. फसविणाऱ्या शिष्यांना गुरूंनी फसविले तर त्यात तिसऱ्या व्यक्तीला वाईट वाटण्याचे कारण नाही. ही व्यवहारातली फिट्टंफाट आहे - जशास तसा व्यवहार आहे असेच समजावे.

महाटक

आपण दुसरिया फसविती । गुरूने फसविले म्हणोनी रडती । ऐसियासाठी श्रीपती । ढोंगी गुरूस निर्मितो ॥ जेणे दैत्यास मोहावया निर्मिली सुरा । जो बाईल होऊनी गेला विरोचनाच्या घरा ॥ तो या लोकिकां ठकां अचतुरां । ठकवाया महाठक ॥ सच्छिष्यही फसेल म्हणोन । लोभी गुरूंचे दोषदर्शन ।

(४५)

एरव्ही फसला तयाकारण । श्रद्धा फलदात्री ॥
लोक फसव्यासी फसवावया । फसव्या गुरूची उत्तम चर्या । ते तंव प्रशंसा करावया । पात्राचि आहे ॥
जैसा वेश्यांच्या गृहीं । टेका टेवती नानकशाही ॥

असे संप्रदायसुरतरूत महाराजांनी कठोर भाषेत सांगितले आहे. सच्छिष्याने फसू नये म्हणून आधीच काळजी घेण्यासाठी लोभी गुरूंचे दोषदर्शन घडवून दिले आहे आणि जरी चुकून एखादा फसलाच तर त्याने दृढ निष्ठा ठेवली तर त्याची श्रद्धाच त्याला चांगले फळ देते. त्यामुळे फसणाऱ्या शिष्याची कोणत्याच प्रकारे काळजी करण्याचे कारण नाही. फसविणाऱ्या लोकांना फसविण्यासाठी फसव्या गुरूचे आचरण सृष्टिनियमांना धरूनच आहे, असे महाराजांच्या विवेचनावरून स्पष्ट दिसते. इतक्या स्पष्टपणे मांडलेले विचार एकनाथ-तुकारामांचीच आठवण करून देतात. **तोंवरी तोंवरी माळांचे भूषण । जंव तुकयाचे दर्शन झाले नाही ॥ तुका म्हणे ऐशा नरा । मोजुनी मारा पैजारा ॥**

(४६)

बायको अर्पण करणे

गुरूला बायको अर्पण करण्यासंबंधी तर महाराजांचे विचार सडेतोड आहेत. ते म्हणतात[१५] 'गुरूला शिष्याच्या बायका अर्पण करणे हे चाळे आहेत. पुनः हा धर्म नसून धर्माची थट्टा आहे. धर्माच्या नांवाखाली आपला तळीराम गार करून घेण्याची ही एक युक्ती आहे. यात प्रश्न असा येता की बायकांना आत्मनिवेदन नांवाची भक्ती आहे की नाही? असेल तर नवऱ्याला सर्वस्व समर्पण केल्यावर पुनः आत्मनिवेदन करण्याइतके स्वातंत्र्य त्यांना कसे येणार? या कृत्यात फाजीलपणा लबाडी बुचाडूपणा लुच्चेपणा सगळे एक झाले आहेत. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्याकरिता व्यवस्थाच करायची म्हटल्यास -

१. महाराज, मी या जन्मात विवाहित आहे, पुढच्या जन्मी कुमारी होऊन आपणास वरीन, असे वचन देऊन पिचकाट सोडावी. **२.** नवऱ्याला हे रुचत असेल तर नवऱ्याला सोडून द्यावे. आणि **३.** बायकोलाच

(४७)

असा व्यभिचार रुचत असेल, तर तिने गुरूच्याच घरी राहावे. नवऱ्याच्या घरी येऊन वंश तरी भ्रष्ट करू नये.

*दुसरे काही साधू म्हणविणारे मूर्ख दुसऱ्याच्या घरात शिरून मंत्र देतात. तेही योग्य नव्हे. कारण लोकांच्या हक्काला जसा कायदा नियामक आहे. तसे धार्मिक हक्काला शास्त्र नियामक आहे. ''माझ्यावर कृपा करा. मला अनुग्रह द्या'' असे म्हटल्याशिवाय अनुग्रह देण्याविषयी शास्त्रात कोठेही सांगितलेले नाही या विरुद्ध वागणारे व घरात शिरून मंत्र देणारे राजाच्या आज्ञेनेठार केले पाहिजेत. [१६] **ऐसे गुरु ... । जिते जाळा ॥**[१७] असे महाराज म्हणतात.

ढोंगी गुरूची खूण

''खाणे पिणे योग्य करून ब्रह्मनिष्ठेच्या बढाया मारणारा, स्वतःच्या देहाकडे लक्ष देऊन शरणागताकडे लक्ष न देणारा, तो साधू नव्हे ही एक अबाधित खूण आहे.'' [१८]

(४८)

''मुक्त आहे की नाही हे ओळखता येणे शक्य नाही. पण **मुक्तीच्या नांवाखाली कोणी भलतेच करू लागला तर अशाला चोप दिल्यास पाप नाही, असे मात्र मी शास्त्रबलाने स्पष्ट म्हणतो.''**[१९] असे महाराज म्हणतात.

आतापर्यंत आपण दांभिक साधूसंबंधी महाराजांचे विचार पाहिलेत. आता साधुवर्गातून महात्मा कसा निवडून काढावा आणि गुरु म्हणून स्वीकारण्याच्या आधी काय करावे, वगैरे संबंधीचे विवेचन पाहू.

गुरुपरीक्षेसाठी प्रश्न

ज्यांना थोडीफार मुमुक्षा उत्पन्न झाली आहे, जे वैराग्याचाहि अभ्यास करू लागले आहेत, अशा साधकांसाठी महाराजांची पत्रे[२०] आणि प्रश्नकदंब[२१] नांवाचा चार अध्यायांचा ग्रंथ अत्यंत वाचनीय आहेत. या प्रश्नकदंबाला **''साधुपरिक्षेचे प्रश्नोपनिषदच''** म्हणावयाला हवे. स्वतःला योगी, ज्ञानी वगैरे म्हणविणाऱ्यासाठी हा जणुंकाय परीक्षेची प्रश्नपत्रिकाच

(४९)

आहे. पण या प्रश्नांची उत्तरे मात्र महाराजांनी दिलेली नाहीत. 'वेळ आल्यास त्यातील प्रश्नांची उत्तरे 'मी तुकारामांच्या अभंगानेहि देईन' असे ते म्हणतात. हे सर्व प्रश्न फारच मनोरंजक आणि भोंदू साधूंना अडवून त्यांची फजिती करणारे आहेत. योगावाचून वेदांताची पोपटपंची करणाऱ्यांना मार्मिक आणि अनुभवाचे प्रश्न विचारून कुंठित केले आहे. या प्रश्नांची उत्तरे अनुभवी अधिकाऱ्यावाचून सांगू नये असा नियम असला तरी अनधिकारी जिज्ञासूंनी हे प्रश्न विचारू नये, असा निषेध मात्र मुळीच नाही.

'या प्रश्नकदंबाच्या योगाने आम्हासारख्या लोक मारून खाणाऱ्यांची नाडी हातात येणार आहे .... धर्म आणि भक्ती न मानून वेदांती म्हणविणारांची परीक्षा पाहण्याकरता हा प्रश्नकदंब मी लिहीत आहे. तो मराठीत लिहिण्याचे कारण की, संस्कृतवेत्ते वादात जी लबाडी करतात ती त्यांना करता येऊ नये.

मूर्ख साधूंचे करावया कंडन । प्रश्नकदंब चालवा पुढे ॥ यांची फजिती करू आम्ही । हे बोलिले शांतहि

(५०)

तुकाराम स्वामी ॥

हे प्रश्नोपनिषद रचून महाराजांनी फसविणाऱ्या साधूंचे कंडण करण्याचे आणि त्यांचेपासून साधकाला वाचविण्याचे आश्वासन दिले आहे, ते महत्वाचे आहे. आजकालच्या जीवनपद्धतीतून आणि शिक्षणक्रमातून शास्त्राभ्यास करण्याला वेळच मिळू शकत नाही. तरी देखील पूर्वसंचितामुळे किंवा सांसारिक दुःखामुळे काही लोकांना परमार्थाची इच्छा कधी कधी उत्पन्न होते. पण शास्त्रज्ञान आणि वैराग्य नसल्यामुळे त्यांची फारच कुचंबणा होते. या लोकांना त्यातल्या त्यात सोपा मार्ग हवा असतो. म्हणून हे लोक महात्मे, योगी, ज्ञानी किंवा भक्त म्हणून प्रसिद्ध असलेल्यांचा अनुग्रह मिळविण्यासाठी धाव घेतात. पण भलत्यांचा नादी लागल्यामुळे परमार्थहि साधला जात नाही आणि त्यांचा संसारही उध्वस्त होऊन जातो. असे होऊ नये म्हणून साधकाने स्वतः कसे असावे? आणि कोणती परीक्षा घेऊन गुरूची निवड करावी? हे समजून घेणे आवश्यक आहे.

(५१)

''साधकांनी आपला परंपरेने प्राप्त झालेला धर्म सोडू नये आणि वेदांत व योगाचा एकत्र अभ्यास करावा'' असे योगवासिष्ठादि सर्व वेदांतग्रंथात प्रतिपादन केले आहे. असे असूनही जे लोक त्याविरहित परमार्थाचा उपदेश करतात, त्यांचे बिंग फोडण्याकरिता योग-वेदांतातील अनुभवाचे प्रश्न गुरूला विचारण्यास महाराजांनी सांगितले आहे. या प्रश्नांची उत्तरे काय मिळतील याचीही कल्पना प्रश्नकदंबात करून दिली आहे. आणि त्या उत्तरानंतर पुन्हा त्यांना काय विचारावे व कसे अडवावे, वगैरेसंबंधी सूक्ष्म धागेदोरे अशारीतीने विणले गेले आहेत की स्वतःला साधू म्हणविणारा भोंदू त्या चक्रव्यूहातून बाहेर पडूंच शकत नाही. हे सर्व मूळ प्रश्न व परंपरेने उपस्थित केलेले उपप्रश्न यांचा सखोल अभ्यास करून साधूची परीक्षा करावी आणि नंतर अनुग्रह घ्यावा की नाही हे ठरवावे. महाराजांच्या या प्रश्नोपनिषदातील विश्लेषणाने खऱ्या जिज्ञासूंचा अतिशय लाभ होणार आहे. त्यामुळे महाराजांचे ग्रंथ वाचणाऱ्यांचा भलत्या

(५२)

मार्गाने जाण्याचा धोका बराच कमी होईल असे निश्चित म्हणता येते.

महाराजांनी भोंदूगिरीचे विश्लेषण करताना आडवाटा कोणत्या, वाटमारे कोणते, त्यांचे पासून बचाव कसा करून घ्यावा, वगैरेसंबंधी असंख्य बिंदू अनेकठिकाणी सांगितले आहेत. त्यानुसार परीक्षा घेऊन गुरुजी पास झाल्यानंतर मग साधकाने शिष्य होऊन त्यांच्या आज्ञेचे अनुसरण करावे आणि स्वतः देखील सद्गुरूंनी घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण व्हावे.

आजकाल ''गुरूने कसे असावे'' याची लक्षणे शिष्य पाहतात आणि ''सच्छिष्याची सर्व लक्षणे शिष्याचे ठिकाणी आहेत की नाहीत'' हे गुरुमंडळी पाहते. पण स्वतःवर काय जबाबदारी आहे हे मात्र दोघेही पाहत नाहीत. म्हणून शिष्याने गुरूची परीक्षा पहावी आणि गुरूनेहि शिष्याची परीक्षा करावी. दोघांनीही आपापली जबाबदारी सांभाळावी. असे झाले तर ती गुरु-शिष्यांची जोडी साऱ्या जगाला मार्गदर्शन करण्याला समर्थ होते.

(५३)

गुरुशिष्यांचे परस्पर बंधन

साधकाने गुरूची परीक्षा घेऊन परमार्थसंपन्न गुरूचे शिष्यत्व एकदा पत्करल्यानंतर मग मात्र कोणत्याही परिस्थितीत आपली निष्ठा कमी होऊ देऊ नये. लग्न होण्यापूर्वी नवरा कसा असावा याची परीक्षा अवश्य करावी पण विवाह केल्यानंतर मात्र पतीला सोडता येत नाही. त्याचप्रमाणे एकदा संप्रदाय स्वीकारला की बंधन आले. या बंधनातून सुटका नाही. कितीही भयंकर प्रसंग आले तरी शिष्याने गुरुनिष्ठा उत्तरोत्तर दृढच करीत जावी. त्यातच त्याचे अंतिम कल्याण आहे. यासंबंधी महाराजांच्या आयुष्यातील काही प्रसंग चरित्रग्रंथातून समजून घेण्यासारखे आहेत[२२] संप्रदायसुरतरूत महाराज म्हणतात,

''मी जर कुमार्गानेगेलो तर मला देखील तुम्ही सांप्रदायिकांनी अडविले पाहिजे. गोरखनाथांनी मच्छिंद्रनाथांना स्त्रीराज्यातून सोडून आणले, पण स्वतः नाथसंप्रदाय सोडला नाही. श्रीकृष्णावरील

(५४)

अनेक आरोप अर्जुनाला माहित असूनही अर्जुनाने कृष्णाला सोडले नाही. त्याचप्रमाणे माझे विकार मी आवरू शकत नसल्यास माझ्या शिष्यांनी मला त्यापासून वाचवावे आणि मीही सांप्रदायिक मंडळी चुकल्यास त्यांना दंड देईन. त्यांनीही ते सहन करावे. पण संप्रदाय सोडण्याचे मनातही आणू नये. श्रद्धानाश हा अत्यंत दुःखद आणि विपरीत पर्यवसायी होत असतो. म्हणून पारमार्थिक गुरुशिष्यसंबंध कधीही मोडूं नये. चित्तातील श्रद्धेची भावना कधीही उणी होऊं देऊं नये.

परी सोडू नये संप्रदाय । श्रद्धानाश दुःखद होय ।
चित्त रक्षायाची धरावी सोय । हा निश्चय सांगतो मी ॥ [२३]

याप्रमाणे महाराजांनी स्वतःबद्दलच संशय घेऊन त्या निमित्ताने आपल्या अनुयायांना उपदेश केला आहे. **''अस्माकं सुचरितानि एव सेव्यानि, नो इतराणि''** - आमच्या सदाचाराचे अनुकरण करा आणि आमच्या ठिकाणी असलेल्या दोषांकडे लक्ष

(५५)

देऊनका.'' या तैत्तिरीय श्रुतीचा अर्थ आपल्या जीवनात बाणविला होता. ते म्हणतात ''या गुरुशिष्यांच्या परस्पर रोधारोधीत गुरु वा शिष्य मरो, किंवा साऱ्या जगाचा उद्धार होवो, पण माझ्यासह माझ्या अनुयायांनी हा माधुर्यसंप्रदाय सोडण्याचे मनातही आणू नये.''

या सर्व विवेचनातून आपल्या मंडळींची सुधारणा करण्याचा प्रबल प्रयत्न आणि श्रद्धाभावना विचलित होऊ न देण्याची तीव्र इच्छा दिसून येते. या दोन महत्वाच्या गोष्टी परमार्थातील शिदोरी म्हणून साधकांनी शेवटपर्यंत हृदयात जपून ठेवण्याजोग्या आहेत.

गुरु कोणाला करावे? : ३ कसोट्या

परमार्थाचा आव आणणाऱ्या तथाकथित साधूंच्या बजबजपुरीतून खरे सत्पुरुष ओळखणे कठीण आहे आणि त्यातून पुनः सद्गुरु म्हणून कोणाचा स्वीकार करावा, हे समजणे त्याहूनही कठीण आहे. महाराजांनी सांगितलेल्या अनेक कसोट्यांपैकी तीन महत्वपूर्ण कसोट्या आपण पाहूं.

(५६)

''१-पूर्ण परमार्थाचा अनुभव, २-संसाराशी अविरोध व ३-दुसऱ्याला सुधारण्याची इच्छा; या तीन गोष्टी एका व्यक्तीत सापडतील तर ती व्यक्ती गुरुशिष्यभार आपल्या शिरावर घेण्यास समर्थ आहे [२४] असे सदगुरूचे लक्षण न्यायशास्त्राच्या तर्कशुद्ध चौकटीत मांडून सिद्ध केले आहे.

१) पूर्ण ब्रह्मानुभव नसेल तर त्याचा गुरु म्हणून काहीही उपयोग नाही.

२) एखाद्याला परमार्थाचा पूर्ण अनुभव असेल पण त्याचा संसाराशी विरोध असेल तर तो महात्मा जंगलात किंवा एकांतात राहील. त्याच्याकडे आपणहून गेलेल्ला मुमुक्षूच लाभ करून घेईल. इतर सांसारिक जनांना मुमुक्षू करून त्यांचा उद्धार करण्याची खटपट तो महात्मा मुळीच करणार नाही. म्हणून संसाराशी अविरोधअसणे आवश्यक आहे. यातील 'संसाराशी अविरोधविषमसत्ताक असतो.' हे मात्र लक्षात ठेवले पाहिजे.

३) पूर्ण ब्रह्मानुभव व संसाराशी अविरोधहे

दोन गुण असले तरी दुसऱ्याला सुधारण्याची इच्छा नसेल तर तो महात्मा स्वतः जीवन्मुक्तीचे सुख भोगेल पण दुसऱ्याला पूर्ण करण्याचे औदार्याचे कार्य त्याचे हातून होणार नाही.

या तिन्ही गोष्टी एका व्यक्तीत असल्या तरच त्याला गुरु म्हणूनशरण जावे. आणि साधकानेही स्वतः साधनचतुष्टय संपादन करावे. परंतु आजकाल गुरु व शिष्य दोघेही स्वतःची जबाबदारी टाळून ती परस्परांवर ढकलतात. त्यामुळे गुरुवर्ग चैन करणारा आढळतो. तर शिष्य फसगत झाली म्हणून ओरडणारा निघतो.

तीन प्रकारची दोषदृष्टी

वरील तीन कसोटीतील 'पूर्ण परमार्थाचा अनुभव' कोणाजवळ आहे, हे बिचाऱ्या साधकाला सहजरित्या समजणे फार कठीण आहे म्हणूनच त्याची फसगत होते. अनुभवाची लालूच दाखवून तोंडाला पाने पुसणाऱ्या पोटभरू साधूंच्या तडाख्यातून सुटल्यावर बिचारा मुमुक्षू निराश होतो आणि आपली

नीतिमत्ता आहे तेवढी पुरे आहे असे समजून सर्वच ठिकाणी दोष पाहू लागतो. ही दोषदृष्टी अगदीच टाकाऊ नाही. कारण हिच्यामुळे पुन्हा फसण्याचा दारुण प्रसंग येत नाही. परंतु या दोषदृष्टीमुळे जगात कोणीच साधू नाही, असे समजणे मात्र फारच घातक आहे. योग्य उपयोग केला तर विषही औषध होते आणि मूर्खपणामुळे अन्न देखील मारक होत असते. म्हणून या दोषदृष्टीचाही उपयोग कसा करून घ्यावा यासंबंधी विवेचन समजून घेण्याजोग आहे. ही दोषदृष्टी तीन प्रकारची आहे[२५]

१) वैयक्तिक दोषदृष्टी

आपल्या मनाच्या विरुद्ध जे जे असेल ते ते दोषरूप समजणे, ही वैयक्तिक दोषदृष्टी होय. ही गुणालाही दोषरूप करते. ''आपल्या विरुद्ध असलेले - आपल्याला आवडत नसलेले सर्व वाईट.'' असे यात समजले जाते. यामुळे चांगले व शास्त्रीय असले तरी ते पटत नाही. म्हणून अशी दोषदृष्टी परमार्थात अत्यंत घातक आहे.

परमार्थाचे असो, पण व्यवहारात देखील, घरात, देशांत, धर्मात कलह माजवून सर्वस्वाचा नाश करणारी हीच दोषदृष्टी होय. अर्थात ही सर्वथैव त्याज्य आहे.

२) सामाजिक दोषदृष्टी

ही काही अंशी बरी आहे व पुष्कळ अंशी वाईट आहे. ''समाजविरोधी जे जे असेल ते ते वाईट'' असे हिचे स्वरूप आहे. प्रत्येक समाजाचे नीतिनियम परस्पर भिन्न असल्याने प्रत्येक समाज दुसऱ्या समाजाच्या दृष्टीने वाईट असतो. बरे, एकाच समाजातही प्रत्येक व्यक्तीत काहीना काही तरी दोष असतोच. तसेच समाजाने एखाद्या व्यक्तीला चांगले म्हटले तर कुटुंब त्या व्यक्तीला वाईट म्हणते व कुटुबांने चांगले म्हटले तर समाज त्या व्यक्तीला वाईट म्हणतो. म्हणून परमार्थात ही विशेष उपयुक्त नसली तरी समाजात या दृष्टीने स्वतःला चांगले म्हणवून घेता येते. अशी ही सामाजिक दोषदृष्टी होय.

३) शास्त्रीय दोषदृष्टी

ही धन्यतमा असून मुमुक्षूंचे कल्याण करणारी जननी आहे. ''**शास्त्राच्या विरुद्ध असलेले सर्वच वाईट**'' अशी बुद्धी म्हणजेच शास्त्रीय दोषदृष्टी होय. अशी दृष्टी असलेला मुमुक्षू पोटभरू साधूंच्या तडाख्यात सापडत नाही आणि समाजाकडून पराभूत न होता आपले पारमार्थिक कल्याण साधून घेतो. केवळ तर्काने किंवा केवळ वचनानें शास्त्रीय कोणते व शास्त्रविरुद्ध कोणते हे चांगले समजत नाही म्हणून ही शिकावी लागते. ही दृष्टी एकदा अंगी बाणली की हंसक्षीर न्यायाप्रमाणे परमार्थिक म्हणविणाऱ्यांचा खरेखोटेपणा चटकन लक्षात येतो. म्हणून मुमुक्षूंनी प्रयत्न करून आपल्या अंगी शास्त्रीय दोषदृष्टी बाणवून उत्तरोत्तर तिचा विकास केला पाहिजे. याच दृष्टीचा उपयोग करून सद्गुरूची परीक्षा करावयास हवी.

गुरूचा शोध

लोकांत असा समज आहे की 'साधकाला अधिकार आला की आपोआप सद्गुरुच त्याला शोधीत येतात आणि अनुग्रह देतात' हा समज काही अंशी

(५१)

बरोबर आहे. परंतु -

गुरुमेव अभिगच्छेत् श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥[बृहदारण्यक उपनिषद]

परिप्रश्नेन सेवया, उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिन-स्तत्त्वदर्शिनः ॥[गीता]

अशी स्पष्ट वचने आहेत श्रोत्रिय आणि ब्रह्मनिष्ठ अशा गुरूकडे शिष्याने बद्धांजली करून जावे, त्यांची सेवा करावी, प्रश्न विचारून पूर्ण शंकानिरसन करून घ्यावे, म्हणजे श्रीगुरु त्याला ज्ञानाचा उपदेश करतात. असा त्या सर्वांचा भावार्थ आहे. तेव्हा वरील समज कितपत बरोबर आहे या संबंधी प्रश्न उत्पन्न होतो. महाराजांनी या दोहोंचा उत्तम समन्वय करून सारसंन्निवेश काढला आहे. ते म्हणतात -

१. वर्णाश्रमाच्या योगे सदाचरण करून चित्तशुद्धी करून घेतलेल आणि **२.** प्रथम संसारात अधर्माने वागून नंतर दुःखामुळे पश्चाताप पावलेले.

असे दोन प्रकारचे साधक असतात.पहिल्या प्रकारच्या लोकांना अनायासे सद्गुरूची प्राप्ती होते,

(६२)

हा नियम अगदी बरोबर आहे. पण श्रीगुरु मिळाल्यानंतर गुरुगृहनिवास, गुरुसेवा, परिप्रश्न वगैरे ज्ञानप्राप्तीसाठी करावेच लागतात, हेही तेवढेच खरे!

दुसऱ्या प्रकारच्या लोकांकडे मात्र आपोआप श्रीगुरु घरी चालून येत नाहीत. अशा लोकांतून भागवतातील कदर्यूप्रमाणे एखादाच महात्मा तरून जातो. म्हणून गुरुशोध करण्याचे कठीण कार्य साधकाला स्वतःला करावेच लागते. यासंबंधी संत तुकाराममहाराजांनी संत ओळखण्याची एक कसोटी सांगितली आहे.-

तुका म्हणे संत ओळखावे कैसे ।
आपण व्हावे तैसे तेव्हा कळे ॥

पण ही कसोटी अन्योन्याश्रय दोषाने युक्त आहे. संत होण्यासाठी संतांना ओळखले पाहिजे. त्यांची सेवा केली पाहिजे. पण स्वतः संत झाल्याशिवाय संतांना ओळखता येत नाही. अतएव महाराजांनी दुसरी कसोटी सांगितली आहे. त्या कसोटीचा

(६३)

उपयोग करणारा साधक वरच्या दर्जाचा असावा लागतो. ज्या साधकांना गुरुपरीक्षेची अत्यंत निकड आहे असे साधक तीन प्रकारच्या संशयाने ग्रस्त असतात. पैकी शेवटचा उच्च दर्जाचा साधकच या योगशास्त्रातील कसोटीच्या साह्यानेगुरुपरीक्षा करू शकतो. (२६)

(१) अंगी अधिकार नसतांना उताविळपणाने काही जण सत्संग करतात. पण वैराग्याचा तडाखा न सोसल्यामुळे गुरूच्या नांवाने खडे फोडतात. यांना खऱ्या साधूपासूनही काही लाभ होऊ शकत नाही. यांनी साधू शोधणे सोडून द्यावे. घरी राहून वर्णाश्रमानुसार धर्माचरणयुक्त प्रपंच करावा. धर्मपालन केल्याने प्रथम चित्तशुद्धी होईल व नंतर वैराग्य उत्पन्न होईल. त्यासोबतच शास्त्राभ्यास व श्रवण, मनन, निदिध्यासन करीत असावे म्हणजे पुढे केव्हा तरी कल्याणकारक मार्ग सापडतो. **नहि कल्याणकृत् कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति ।** [गीता] यावर पूर्ण भरवंसा ठेऊन हळू हळू आपला अधिकार वाढवीत असावे.

(६४)

२) वैराग्यादि चांगले गुण असून देखील गुरु चांगला न मिळाल्यामुळे पस्तावून घरी गेलेले दुसऱ्या दर्जाचे साधक होत. यांनीही संसार न सोडता घरी राहूनच धर्मशास्त्रानुसार वर्तन ठेवावे; वैराग्यादि साधनसंपन्नता मिळवावी म्हणजे चित्तशुद्धी होऊन सत्संग प्राप्त होतो.

३) उच्च दर्जाचे साधक वैराग्यादि साधनसंपन्न असतात. परंतु परमार्थातील फसवाफसवी ऐकून संशयाने ग्रस्त होतात. सत्पुरुषांकडे जाण्याची त्यांची हिंमत होत नाही. अशा उत्तम प्रकारच्या साधकांकरता महाराजांनी गुरुप्राप्तीचा योगातील उपाय सुचविला आहे.(२७)

योगातील कसोटी

पतंजलींच्या योगदर्शनात सिद्धदर्शनाविषयी एक योगसूत्र आहे व तोच गुरुस्वरूपाच्या निश्चयाचा उत्तम उपाय आहे.

''मूर्धज्योतिषि सिद्धदर्शनम्''

महाराज म्हणतात, या सूत्रातील प्रक्रियेने

सिद्धांचे दर्शन होते. त्यातून आपले गुरु कोण आहेत ते ओळखण्याविषयी दिशा मिळते. मस्तकात एक प्रकाशमय छिद्र आहे. तेथे संयम केला असता पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्गातील सिद्धांचे दर्शन होते. त्यातील **आपले जे गुरु असतात ते द्विदल चक्रावर मधोमध विराजमान असलेले दिसतात**. हीच गुरु शोधण्याची उत्तम रीत आहे. संध्येत करण्यात येणाऱ्या प्राणायामातच थोडी सुधारणा केली असता, असा संयम करता येतो. म्हणून यात पूर्वीच्या कसोटीप्रमाणे अन्योन्याश्रय दोष नाही. म्हणून साधकाने गुरूंना स्पष्ट म्हणावे की, 'मूर्धाधारणा सांगा म्हणजे मी तुमच्या स्वरूपाचा निश्चय करीन.' ते जर त्याचे जन्मजन्मांतरीचे गुरु असतील तर ते आनंदाने शिष्याची ही मागणी पूरी करतील आणि द्विदल चक्रावर दर्शन देतील.

ही योगशास्त्रातील गुरु शोधण्याची रीत फारच महत्वाची आणि कधीही चूक होऊ न देणारी अशी आहे. परंतु गुरु आणि शिष्य या दोन्ही वर्गांनी

या पद्धतीला फाटा दिल्यामुळे सर्वत्र फसवाफसवीची ओरड ऐकू येते. यासंबंधी महाराजांनी बरेच लिहून मार्गदर्शन केले आहे.

गुरुभक्ती

वरीलप्रमाणे श्रीगुरूंच्या स्वरूपाचा निश्चय झाल्यानंतर गुरुसेवा आणि गुरुभक्तीची सुरवात होते शिष्याने गुरूला साक्षात् परब्रह्म समजूनच सेवा करायची असते. [२८] जर त्याची गुरूचे ठिकाणी ईश्वरबुद्धी नसेल तर त्याला परमार्थ तर मिळत नाहीच पण उलट त्याची अधोगती होते. ही गुरुभक्ती दोन प्रकारची असल्याचे महाराजांनी सांगितले आहे. निराकाराश्रित गुरुभक्ती व साकारश्रित गुरुभक्ती.[२९]

१. निराकाराश्रित गुरुभक्ती

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुस्साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

गुरु हे साक्षात् पूर्ण ब्रह्मच असतात.

१) ते जेव्हा शिष्याला सृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम समजावून देतात तेव्हा त्यांना **ब्रह्मदेव** समजावे.

२) सर्व शंकांचा परिहार करून शिष्याला शिक्षण देऊन त्याचे रक्षण करतात व त्याला ब्रह्मस्थिती मिळवून देतात. तेव्हा त्यांना **विष्णुरूप** समजावे.

३) ब्रह्मज्ञानानंतर हे सारे जग मिथ्या आहे याचा प्रत्यय आणून देतात तेव्हा त्यांना **शिवरूप** समजावे. असा ब्रह्मा-विष्णु-महेश त्रिविध प्रत्यय निराकाराश्रित सद्गुरुभक्तीत शिष्याला येत असतो.

४) जीवशिवांचे समाधीत ऐक्य होते तेव्हा श्रीगुरु हे निर्विकल्प परब्रह्मच आहेत असा गुरुतत्त्वाचा अनुभव येतो. ही निराकाराश्रित गुरुभक्ती केवळ परमात्म-स्वरूपिणी आहे.

२. साकारश्रित गुरुभक्ती

निराकाराश्रित गुरुभक्ती पूर्ण झाली असता समाधी साधली जाते व त्यानंतर होणाऱ्या व्युत्थानात जे जे विकाराभास उठतात ते ते सर्व ब्रह्मरूप करणे हेच साकाराश्रित भक्तीचे कार्य आहे. हे विकार आपल्या ठिकाणी जसे आढळतात तसेच गुरूच्याही ठिकाणी दिसतात. गुरूच्या ठिकाणी भासमान झालेले

विकार भक्तिरूप केले जातात. पुत्रोत्पादनकाली प्रजापतित्व, कुटुंबपालनकाली विष्णुत्व, क्रोधारोहण-काली रुद्रत्व वगैरेंचा अनुभव घेऊन भक्तीत अंतर पडू न देणे हाच या भक्तीचा उद्देश आहे. **''तत्तद्विकारोपहित साक्षीचैतन्यव्यतिरिक्त ब्रह्मचैतन्य गुरूला समजणे''** हेच तिचे स्वरूप आहे.

साकाराश्रित भक्तीचा विपर्यास

पण दुर्दैवाने या भक्तीचा अत्यंत विपर्यास झालेला आहे. गुरूने स्त्रीची इच्छा केली असता तो कृष्ण समजावा, या समजुतीच्या आश्रयाने काही पंथात भयावह अधर्म बोकळलेला दिसून येतो. बायका अर्पण करण्याचा अत्यंत निंद्य आणि अश्लील प्रकार यामुळेच वाढतो. पहिली गुरुभक्ती गुरु व शिष्य दोघांनाही दुःसाध्य असल्यामुळे सांसारिक कामनापूर्तीसाठी परमार्थाच्या नांवाखाली दुसरीचाच अवलंब केला जातो. तांत्रिक मार्गातील प्रकार तर फारच बीभत्स आणि विपर्यस्त आहेत. ही दुसरी भक्ती उत्तम असून देखील तिच्या नांवाखाली

(६९)

वासनापूर्तीचा प्रयत्न केला गेल्यामुळे फारच अनर्थ झालेले आहेत.

निराकाराश्रित गुरुभक्ती विशेषतः परमार्थाला व साकाराश्रित गुरुभक्ती किंचित व्यवहाराला धरून आहे. दुसऱ्या भक्तीत जशी ब्रह्मबुद्धी करण्याची जबाबदारी शिष्याकडे आहे तशी गुरुपणा अंगी येऊ न देण्याची जबाबदारी गुरुकडे आहे. म्हणजे शिष्यानेसाधूचे ठिकाणी क्रोधपाहिला तर त्याला रुद्र समजावे, पण साधूने स्वतःला रुद्र समजूं नये. उलट विकारांचा त्यागच करण्याचा प्रयत्न करावा. **'कोणताही विकार न येता शिष्यासकट माझी ब्रह्मबुद्धी केव्हा होईल'** याचीच चिंता आणि याचाच प्रयत्न गुरूने करावयास हवा.

जो शिष्याची ने घे सेवा । मानी देवासारिखे ॥
त्याचा फळे उपदेश । येरा दोष उफराटे ॥

या तुकोबांच्या वचनात गुरूने कसे वागावे ते सांगितले आहे.

(७०)

गुरुशिष्यांची समानता व एकतानता

या गुरुशिष्यांच्या संबंधात दोन महत्वाची पथ्ये आहेत. व्यवहारात दोघांनीही समान पातळीवर राहून परस्परांना मदत करावी आणि परमार्थात मात्र शिष्याने आपल्या सर्व वृत्ती गुरूच्या स्वाधीन कराव्या.

व्यवहारे मंत्रसाम्यं भवेद्देशिकशिष्ययोः ।
परमार्थे गुर्वधीनः इति स्वमतनिर्णयः ॥ [य१६]

व्यवहारात गुरु-शिष्यांनी तुळेच्या पारड्याप्रमाणे समसमान राहून परस्पर विचाराने आणि व्यावहारिक मदतीने एकमेकांना साह्य केले पाहिजे. व्यवहारात गुरूने शिष्यासाठी समान हक्क दिले पाहिजेत. 'अपूर्ण शिष्यालाही हक्क देण्याचे औदार्य दाखविलेच पाहिजे.' ही व्यावहारिक उत्क्रांति परमार्थाच्या पायथ्याशी जाऊन भिडली म्हणजे शिष्य परमार्थशिखरावर चढण्यास उद्युक्त होतो. त्यानंतर मात्र शिष्याने आपले सर्वस्व गुरूच्याच स्वाधीन करावयास हवे. सर्व वृत्ती गुरूच्या हाती दिल्यानंतरच शिष्याचा परमार्थ पूर्ण साधला जातो. हीच परमार्थातील

(७१)

एकतानता होय.

परमार्थात एकतानता व व्यवहारात समतोलपणा जेव्हा गुरुशिष्यांचे ठिकाणी प्राप्त होतात व दोघेही आपापली जबाबदारी पूर्णपणे सांभाळतात तेव्हा ते गुरु-शिष्य पुष्कळ युगेपर्यंत जगाला सुधारणेचा मार्ग दाखवून देण्याला समर्थ होतात. [३०]

यासंबंधी कृष्णार्जुनांचे उदाहरण जगविख्यात आहे. राज्य मिळवून देण्याच्या कामात कृष्णाने अर्जुनाला मदत केली आणि दुर्जनांचा संहार करण्याच्या कामात अर्जुनाने श्रीकृष्णाला साह्य केले. ही व्यवहारातील समतोला असून, गीतेच्या स्वाधीन अर्जुनाने आपल्या सर्व वृत्ती सोपविल्या व **''करिष्ये वचनं तव''** असे म्हणून अर्जुनाने पारमार्थिक एकतानता साध्य केली. अशा या गुरुशिष्यांची संवादरूप असलेली गीता युगे युगे पर्यंत जगाला मार्गदर्शन करण्याला समर्थ आहे. हे आजही दिसून येत आहे.

(७२)

समारोप

याप्रमाणे अनुभुतिमार्गातील पाथेयाचा आणि पथ्यांचा श्रीगुलाबराव महाराजांच्या वाङ्मयातून थोडक्यात विचार केला. परमार्थमार्गावरील पथिकासंबंधी मूलभूत गोष्टी पाहिल्या. चमत्कारांवर कितपत भरवंसा ठेवावा? वेडे आणि साधू यात फरक कोणता? दांभिक साधूंच्या तडाख्यातून कसे सावध राहावे? गुरूची परीक्षा कशी करावी? गुरुभक्ती म्हणजे काय? गुरुशिष्यांचे व्यावहारिक आणि पारमार्थिक संबंध कसे असावे? या सर्व प्रश्नांचा संक्षेपाने विचार करून अनुभूतिमार्गातील राजमार्ग, आडवाटा व खाचखळगे पाहिलेत.

महाराजांनी आपल्या ग्रंथात अनेक ठिकाणी ब्रह्मानुभव प्राप्त करून घेण्यासंबंधी योगाच्या आणि ज्ञानाच्या प्रक्रिया असंख्य सांगितल्या आहेत. आपापल्या अधिकारानुसार तेच साधकांचे **राजमार्ग** आहेत.

चमत्कारांच्या मागे जाणे, वेड्यांना साधू समजणे वगैरे **आडवाटा** आहेत.

(७३)

स्वतःला साधू म्हणवून फसविणारे भोंदुगुरु हे परमार्थातील **वाटमारे** आहेत.

या सर्व बाबींचा विचार केला तर असे दिसून येते की, ब्रह्मनिष्ठांनी कसेही आचरण केले तरी ते प्रारब्धानुसार असल्यामुळे त्यांना जरी दोष नाही, तरी इतरांनी त्यांचे अंधानुकरण केले तर ते निश्चितच साधकांना आणि सर्व समाजाला अधोगतीला नेणारे आहे. ज्यांना उपदेश करावयाचा आहे, लोकसंग्रह करून समाजाचा उद्धार करावयाचा आहे, त्यांचे आचरण **''सतां धर्मम् अदूषयन्''** असेच असले पाहिजे. पण आधुनिक साधूंचे आचरण बरेच वेळा सज्जनांच्या धर्माला दूषित करणारे आढळून येते.

खऱ्या साधूंनी प्रारब्धाने दूषित झालेल्या स्वतःच्या आचरणाची निंदाच केलेली आहे. त्यांना उज्वल ठरविले नाही.**''अस्माकं सुचरितानि एव सेव्यानि, नो इतराणि''** म्हणूनच धर्मानुसार असलेल्या सदाचरणाचे अनुकरण करावे आणि शास्त्रानुसार असलेला उपदेशच ग्रहण करावा. साधकाने वैराग्यादि

(७४)

साधनसंपन्न होऊनच या परमार्थात प्रवेश करावा म्हणजे वैराग्यरूपी सखा त्याला शेवटपर्यंत साथ देईल व त्याचे संरक्षण करील.

गुरु पहावया जाऊ नये कोठे । निजचित्त पेठे शोध घ्यावा ॥१॥ शिकल्याचा मद ज्याचा गेला नाही । त्याने ठायी ठायी फिरूं नाही ॥२॥ आधी दृढ कीजे निज उपासना । तेथे अभिमाना हारविजे ॥३॥ मग संतसंगी भेटतो आचार्य । आयती जैं होय कृष्णकृपा ॥४॥ अभंग.१२९०

असे आचार्य गुरुरूपाने भेटल्यानंतर त्यांनी उपदेश केलेल्या प्रक्रियेप्रमाणे चालल्यास तोच राजमार्ग साधकाला परमार्थाच्या मंदिरापर्यत सरळ आणि सुखरूप पोहचवील, असे महाराजांच्या एकूण विवेचनावरून दिसून येईल.

ooo

(७५)

परिशिष्ट –

साधुबोधातील प्रश्नोत्तरे

* **आचार्य कोणास म्हणावे ?**[९०].

मुख्य धर्म व प्रासंगिक धर्म शास्त्रातून प्रसंगी जो समन्वयाने पुढे ठेवो त्यास! मग ते धर्म प्रवृत्तिलक्षण असोत की निवृत्तिलक्षण असोत

* **गुरु कोण ?**

सन्मार्ग व ब्रह्मज्ञान सांगतो तो.[१७]

* **दयाळू कोण**?

संशयच्छेता.[१०७]

* **गुरुत्वाचा अभिमान गळण्याचा मार्ग कोणता?**

शिष्याचे सद्गुण आपल्याही अंगी आणण्याची खटपट करणे हाच!

* **सद्गुरूची साधी परीक्षा कोणती?**

निष्कामाला पाहून अत्यंत द्रवणे व सकामाला पाहून त्याच्या दैवानुसार वागणे ! हे सद्गुरूचे सोपे लक्षण आहे. याच्या उलट लक्षण असद्गुरूचे आहे.[१०८]

(७६)

* **ढोंगी गुरु कसा ओळखावा?**

खाणेपिणे योग्य करून, ब्रह्मनिष्ठतेच्या बढाया मारून, देहाकडे लक्ष देऊन, जो शरणागताकडे लक्ष देत नाही, तो साधू नव्हे; ही एक अबाधित खूण आहे.[१९८]

* **तोंडपुंज्या गुरूचे साधे लक्षण कोणते?**

निष्कामांची उपेक्षा करून इतरांस मान डोलावणे.[११६]

* **तोंडपुंज्या शिष्य कोण असतो?**

तोंडावर गुरूची स्तुती करून पारीक्षक लक्षण आपण अपूर्ण असून जे दुसऱ्यावरही लावतात आणि गुरुसमोरही त्याचा कधी कधी उपयोग करतात ते!

* **शिष्याने गुरूत कोणता गुण पहावा?**

आपल्याला पाहिजे असेल ते ज्ञान ![१२४]

* **गुरुने शिष्याची परीक्षा कशी करावी?**

स्वतः दूषित झाल्यासारखे दाखवून ![१२५]

* **आपण लोभी आहो असे शिष्याला विनाकारण**

(७७)

वाटत असल्यास गुरूने काय करावे?

आपले दुर्गुण व दुसऱ्या कोणाचे सद्गुण दुसऱ्याकडून त्याचे कानावर घालावे व नंतर त्याला दुसरा गुरु बोटाने दाखवावा.[१२९]

* **शिष्याची परीक्षा पाहण्याकरता गुरूने आपली बढाई करावी असे आपण मागे सांगितले, त्यात काही तारतम्य आहे काय?**

अवश्य तारतम्य आहे.- **१.**मी कर्मनिष्ठ आहे अशी बढाई गुरूने केली असल्यास आचरून दाखवावे. **२.**वसिष्ठाप्रमाणे मी ज्ञाननिष्ठ आहे अशी बढाई केल्यास व सच्छिष्याचा तिच्यावर विश्वास बसल्यास त्याचा उपधिमोक्ष गुरूने केला पाहिजे. **३.**पण मी भगवद्भक्त आहे अशा प्रकारची बढाई कोणत्याही गुरूने शिष्याची परीक्षा पाहण्याकरीता करू नये, तर मी भगवंताच्या दासांचा दास आहे. असा लीनपणा घ्यावा, कारण भक्ती क्षणाभिमानाच्याही विरुद्ध आहे.[१४९]

(७८)

* **पारमार्थिक गुरुमध्येही दोष दिसल्यास ते कसे उपसाहावे?**[१४१].

विषयामध्येही गुरुदोषापेक्षा अधिक दोष आहे चिंतन करून उपसाहावे.

* **पुराणात अवतारांची कृत्ये सांगितली आहेत व जीवांची कृत्येही सांगितली आहेत, त्यांचे कसे अनुकरण करावे ?**[२०३]

वर्तन श्रुत्यनुसार असेल तर कोणीही कोणाचेही अनुकरण करावे, **श्रुतिविरुद्ध कोणाचेही कोणी अनुकरण करू नये.** आणि प्रसंग मध्यम असेल तर मुक्तांनी अवतारांचे व साधकांनी भक्तांचे अनुकरण करावे.

* **नेहमी कोणाविषयी शंका घ्यावी?**

इंद्रिय व मन याविषयी ![२३०]

* **आपल्या इंद्रियावर व मनावर विश्वास मागे कोणी टाकला होता काय?**

कोण्याही शहाण्याने टाकला नाही.[२७३]

(७९)

* **रागद्वेष गेले हे केव्हा समजावे?**

रागद्वेषांचा द्वेष शांत होझ तेव्हा ![३१८]

* **तोपर्यंत कसे करावे?**

शुद्ध रागद्वेषांनी अशुद्ध रागद्वेषांच जय करावा![३१९]

.....

संदर्भ टीपा

१)कुंतिवचन :- आपदः सन्तु नः शश्वत् ॥ महाभारत. २)उपदेशामृत पत्रे भा. १, पत्र २८, लक्ष्मणराव केकरेंना पत्र पा.१२८. स्त्री अथवा पुरुषा । जवं नाही तीव्र मुमुक्षा । तवं सोडूनी संसारविशेषा । विटंबना करू नये ॥२७॥ अंतरी परमार्थ धरावा। बाहेरी व्यवहार करावा। आवडी भगवंत भजावा । हळू हळू मिळवावा विराग ॥२९॥ आधी प्रपंच करावा नेटका । मग साधावे परमार्थ विवेका । तीव्र मुमुक्षा नसता देखा । हाचि मार्ग उत्तम ॥३१॥ ३)साधुबोध प्रश्न २०९, २१०.पा.९१. ४)साधुबोध प्रश्न २१०. ५)साधुबोध प्रश्न २१२. ६.७)अलौकिक व्याख्यानमाला. १२७ ते १३०. ८)चितौ देहे च यो रागी, नासौ मुक्तो न भोगभाक् । मूढः केवळ दुःखात्मा इति स्वमतनिर्णयः य१६ ९)अलौकिक व्याख्यानमाला - ध्यान १०) य७, पा.२११ ते २२०, पत्र ३२-३३. ११)य १२, पा. १५४ ते १६०. १२)य१२, पा.१६५ ,१६९. १३)साधुबोध प्र. २२३. १४)साधुबोध प्र.२२४ १५)साधुबोध प्र. २१४. १६)साधुबोध प्र. १९९. १७)अभंग

(८०)

गाथा १२६२. पा.२७१. १८)साधुबोध प्र.१९८. १९)साधुबोध प्र. २०४. २०)यष्टी १२, पत्र ३२-३३-३४. २१)यष्टी ७ प्र. २४, पान १५७ ते १७४. २२)श्री गुलाबराव महाराजांचे चरित्र आवृत्ती २री, पा. २१ ते २६, पा. २१ ते २६/य७ पत्र १०, पा. ९७-९८/ य१२पा.१६७. २३)संप्रदायसुरतरू अध्याय २०, मीही प्रवर्तलिया परस्त्रीगमनी । तरी निरोधावे मजलागोनी । परी जाऊ नये सोडोनी । मम मार्गाते ॥४२५॥ गोरक्षे मत्स्येन्द्रा पद्मीनीपासोनी सोडविले। परी नाथसंप्रदाया नाही त्याजिले । तैसे मियाही विपरित केले। तरी मज दंडावे सांप्रदायिकी ॥४२६॥ सांप्रदायिक कोणी चुकता । तरी माझा दंड साहावा सर्वथा । एवं गुरुशिष्य व्यवस्था । पुढेही क्रमावी ॥४२७॥ मजविषयी स्त्रियांनी विश्वासू नये ॥४३०॥ एवं विश्वास न धरावा । परी मार्गही न सोडावा । कारण संप्रदाय माझा बरवा । श्रीकृष्णभक्तिवर्धक ॥४३१॥ २४)अलौकिक व्याख्यानमाला अ ४. २५)य ७ व १२. २६,२७)य.१२ पा. १७०-१७१. २८) यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ॥ २९)अलौकिक व्याख्यानमाला, प्र.४. ३०)अलौकिक व्याख्यानमाला प्र. ४, पा. ६४.

०००

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.